संयुक्त प्रसिद्धीपत्रक: भारत-कॅनडा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पातळीवरील सुरक्षा संवाद (06 ऑक्टोबर 2026)

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांच्या निमंत्रणावरून कॅनडाच्या पंतप्रधानांचे वरिष्ठ राजनैतिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचे सल्लागार श्री डेव्हिड मॉरिसन यांनी 05 ते 07 ऑक्टोबर 2026 दरम्यान भारताला भेट दिली.

2. नवी दिल्लीतील ही बैठक राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पातळीवरील सुरू असलेल्या द्विपक्षीय सुरक्षा संवादाचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आली होती. या स्वरूपातील आधीच्या बैठका सप्टेंबर 2025 मध्ये नवी दिल्लीत आणि फेब्रुवारी 2026 मध्ये ओटावा येथे पार पडल्या होत्या.

3. मार्च 2026 मध्ये नवी दिल्ली येथे आणि जून 2026 मध्ये इव्हियान येथील जी7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या भेटींदरम्यान आपापल्या पंतप्रधानांच्या मिळालेल्या मार्गदर्शनाची दोन्ही बाजूंनी दखल घेतली.

4. परस्पर विश्वास, एकमेकांच्या चिंता आणि संवेदनशीलतेचा आदर आणि द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी सामायिक वचनबद्धतेने प्रेरित अशा गेल्या वर्षभरातील सातत्यपूर्ण व रचनात्मक द्विपक्षीय संवादाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारासाठी (सीईपीए) वाटाघाटी पुढे नेण्याच्या प्रयत्नांचे त्यांनी स्वागत केले. दोन्ही देशांच्या नेतृत्वाच्या दृष्टिकोनाला अनुसरून ठोस द्विपक्षीय संरक्षण संबंध पुढे नेण्याच्या वाढत्या क्षमतेवरही त्यांनी चर्चा केली.

5. बैठकीदरम्यान, उभय बाजूंनी द्विपक्षीय सुरक्षा आणि कायदा अंमलबजावणी क्षेत्रातील सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला; यामध्ये फेब्रुवारी 2026 मध्ये निश्चित करण्यात आलेल्या सामायिक सुरक्षा कार्य आराखड्याच्या अंमलबजावणीचाही समावेश होता.

6. आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी, दहशतवाद आणि हिंसक अतिरेकीपणा, मानवी आणि अंमली पदार्थांची तस्करी, सायबर गुन्हेगारी, खंडणी आणि गुन्हेगारांच्या प्रत्यार्पण यांविरोधात लढा देण्यासाठी समन्वय व सहकार्य अधिक दृढ करण्याचे त्यांनी मान्य केले. तसेच, सायबर सुरक्षा आणि आर्थिक सुरक्षा यांबाबत पद्धतशीर संवाद सुरू करण्याच्या शक्यतेसह, प्रत्यक्ष सहकार्यासाठी अतिरिक्त क्षेत्रे निश्चित करण्याच्या वचनबद्धतेचाही त्यांनी पुनरुच्चार केला.

7. परस्पर चिंतेच्या मुद्द्यांवर सुव्यवस्थित संवाद आणि वेळेवर माहितीची देवाणघेवाण सुलभ करण्यासाठी विद्यमान संस्थात्मक यंत्रणा बळकट करणे आणि आवश्यकतेनुसार नवीन संपर्क माध्यमे स्थापन करणे यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली.

8. उभय बाजूंनी प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही विचारांचे आदान-प्रदान केले.

नवी दिल्ली

07 ऑक्टोबर 2026